महाराष्ट्रातील सेतू सोसायटीद्वारा वितरीत करण्यात येणाऱ्या सेवांच्या दरामध्ये सुसंगती आणण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मातंसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९**
७ वा मजला, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२
तारीख: ९ /०२/२०१५

वाचा :-

१) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस/नस्ती/०७/६८/३९,दि.४ जानेवारी,२००८**
२) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस/नस्ती/०७/३७/३९,दि.२९ ऑक्टोबर,२००८**
३) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस/नस्ती/०९/८९/३९,दि.२५ नोव्हेंबर,२००९**
४) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस/नस्ती/०९/८९/३९,दि.१५ जानेवारी,२०१०**
५) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस/प्र.क्र.२८/३९,दि.२० ऑगस्ट,२०१०**
६) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस २०१२/नस्ती/८७/३९,दि.३ मार्च,२०१२**
७) **शासन निर्णय, सा.प्र.वि.क्रमांक: मातंस२०१२/प्र.क्र.१५२/३९,दि.२३ मे,२०१२**
८) **माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या सचिव स्तरावरील प्रकल्प अंमलबजाणी समितीचे दिनांक -३० डिसेंबर,२०१४ चे इतिवृत्त.**

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील नागरिकांना विविध शासकीय सेवा निरनिराळया माध्यमांच्या सहाय्याने पुरविण्यात येत आहेत. गाव पातळीवर महा-ई-सेवा केंद्र कार्यरत आहेत. तालुका व जिल्हा पातळीवर खाजगी संस्थांच्या सहाय्याने सेतू केंद्र कार्यरत आहेत. दि. २३ मे,२०१२ च्या शासन निर्णयानुसार महा-ई-सेवा केंद्राद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या दरांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. जिल्हा व तालुका पातळीवर कार्यरत असणाऱ्या सेतू केंद्रांकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे दर हे निविदा प्रक्रियेद्वारे ठरत असून ते प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहेत. प्रत्येक जिल्हयामध्ये सेतू केंद्राकडून वापरले जाणारे सॉफ्टवेअर निरनिराळे असल्याने अर्जाचे नमुने व वितरीत केली जाणारी प्रमाणपत्र/दाखले यामध्ये जिल्हापरत्वे तफावत आढळून येते. संपूर्ण राज्यामध्ये एकच दर आकरणी करण्यासाठी व Public Service delivery Guarantee Act ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व सेतू केंद्रांनी निश्चित दराने (रु.२० + सेवाकर) महाऑनलाईन पार्टलच्या माध्यमातून सेवा देणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त बाबी विचारात घेऊन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे:-

जिल्हा व तालुका पातळीवर कार्यरत असणाऱ्या सर्व सेतू केंद्र महाऑनलाईन सर्व्हीस डिलीव्हरी मॉडेलशी जोडण्यात यावीत व त्यांनी महाऑनलाईनचा सॉफ्टवेअरद्वारे शासनाकडून नागरिकांना सेतू केंद्राद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी रु. २०+ सेवा कर हा दर निश्चीत करण्यात येत आहे.

## I. <u>शासन ते नागरीक सेतू केंद्राच्या महसूल वाटपाची पद्धत</u>

१. शासन ते नागरीक सेवा (G२C सेवा) जिल्हा सेतु सोसायटीबरोबर बुट ऑपरेटरची सध्याच्या कराराची मुदत संपली नसल्यास परिशिष्ट 'क' मधील महसुली वाटपानुसार वाटप करण्यात यावे .

२. जिल्हा सेतू सोसायटीबरोबर बुट ऑपरेटरचा करार संपला असल्यास त्यानी गोंदिया पध्दत किंवा खाजगी पध्दत वापरावी त्याचे महसूल वाटप पुढील प्रमाणे राहील:-

अ. गोंदिया पध्दती नुसार जिल्हा प्रशासनाने स्वत: ची संगणक साधनसामुग्री (Hardware) व कंत्राटी मनुष्यबळ वापरून महाऑनलाईन पोर्टलच्या सहाय्याने सेतू केंद्र कार्यान्वित करावे. ज्या ठिकाणी खाजगी संस्थेशी करार संपला आहे किंवा पुर्वी कार्यरत नसलेली सेतू केंद्रे पुन्हा कार्यरत करायची आहेत अशा ठिकाणी महाऑनलाईन पोर्टल वापरण्यास सुरवात करावी. गोंदिया पध्दती नुसार कार्यन्वित सेतू केंद्रासाठी महसूल वाटप खालीलप्रमाणे राहिल.

**नागरिकांसाठी दर- रु. २०+ सेवा कर**
**राज्य सेतू सोसायटी -रु. १६**
**महाऑनलाईन- रु. ४**

ब. सार्वजनिक खाजगी पध्दत - सर्व जिल्हयांनी सेवा पुरविण्यासाठी गोंदिया पद्धतीचा वापर करावा असे अपेक्षित आहे; परंतु जेथे बुट तत्वावर संगणक साधनसामुग्री (Hardware), मुनष्यबळ इत्यादी बाबींचा खाजगी संस्थेकडून वापर करण्यात आला आहे अशा ठिकाणी सेतू महाराष्ट्रने मान्यता दिलेल्या पद्धतीचा सेतु RFP नुसार निविदा प्रक्रीयेचा वापर करावा. याबाबत महसूल वाटप खालील प्रमाणे राहील.

| संस्थेचे नांव | उत्पन्नाचे वाटप |
|---|---|
| राज्य सेतू सोसायटी | रु. १/- |
| जिल्हा सेतू सोसायटी | किमान रु. २/- ते कमाल रु. ५/- |
| महाऑनलाईन | रु. ४/- |
| Boot Operator | रु. १० ते रु. १३ च्या दरम्यान |

सेतू केंद्रानी महाऑनलाईन पोर्टलचा वापर पूर्णपणे करावा या व्यतिरिक्त इतर सेवा पुरवायच्या असल्यास सेतू केंद्राना माहिती तंत्रज्ञान संचालनालयाशी संपर्क साधावा. अशा सेवांची व्यवहार्यता तपासून सदर सेवा महाऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात याव्यात. दि. २३ मे,२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या शासनाच्या Model RFP मधील तरतुदी या बाबीपुरत्या सुधारित करण्यात येतील Boot Operator चे Boot Operator कडुन सॉफ्टवेअर विकसित करणे व महसूली वाटप या बाबी Model RFP मधुन वगळल्या जातील.

II. **<u>शासन ते नागरीक व B - G२C (केंद्रशासन) व B२C सेवा</u>**

केंद्र शासनाच्या B२C व G२C सेवा पुरविण्यासाठी सेतू केंद्रांनी APNA CSC Portal चा वापर करावा. याकरिता सेतू केंद्र चालकानी त्यांचा OMT ID https://www.csclive.in या वेबसाईटवर नोंदवावा तसेच B२C सेवा कार्यान्वित करण्यासाठी सेतू केंद्रानी https://www.apna.csc.gov.in या वेबसाईटवर लॉगीन करावे.

**महसूल वाटप खालील प्रमाणे राहिल**

**सेतू केंद्र - ८०%**

**जिल्हासेतू सोसायटी - १०%**

**सीएसी एसपीव्ही - १०%**

III. **<u>फोटोकॉपी स्कॅनिंग इ. सेवांचे दर</u>**

फोटोकॉपी व स्कॅनिंगसाठीचे दर दि. २३ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहतील व इतर सेवांसाठीचे दर शासन निर्णय दि. २०/०८/२०१० मधील तरतुदीनुसार राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०९१४५३०५३३११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Validity unknown

Digitally signed by Suryakant Hari Jadhav
Date: 2015.02.10 10:38:58 IST
Reason:

**(सू.ह.जाधव)**

सह सचिव तथा संचालक (मातं)

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,

४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

५) मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,

६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

७) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,

८) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,

९) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

११) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई)
१३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, नागपूर)
१४) महालेखापाल, (लेखा परीक्षा , महाराष्ट्र, मुंबई )
१५) महालेखापाल, लेखापरीक्षा महाराष्ट्र, नागपूर
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व नागपूर
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) सर्व पोलीस आयुक्त
२०) सर्व विभागीय आयुक्त,
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२) सर्व जिल्हाधिकारी,
२३) सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४) सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी
२५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२६) पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
२७) सर्व मंत्रालयीन विभाग
२८) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई
२९) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३०) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३१) निवड नस्ती (२ प्रती)

# परिशिष्ट "क"
## सेतू सुविधा केंद्राच्या महसूल वाटपाचे दर

| जिल्हा | सद्याचे दर | सुधारीत दर |
|---|---|---|
| Nagpur | Rs 20 (Rs 4 DSS + Rs 14 V + Rs 2 RSS) | Rs 20 (Rs 4 DSS + Rs 1 RSS + Rs 14 V + Rs 1 MoL) |
| Bhandara | Rs 13 (Rs 7 DSS + Rs 6 V) | Rs 20 (Rs 9 DSS +1 RSS + Rs 6 V + Rs 4 MoL) |
| Buldhana | Rs 15 (Rs 4 RSS + Rs 6 DSS + Rs 5V) | Rs 20 (Rs 10 DSS + Rs 1 RSS + Rs 5 V + Rs 4 MoL) |
| Nashik | Rs 28 (Rs 7.56 DSS + Rs 20.44 V) | Rs 20 (Rs 4 DSS + Rs1 RSS + Rs 13 V+ Rs 2 MoL) |
| Gadchiroli | Rs 12 (Rs 2 DSS + Rs 10 V) | Rs 20 (Rs 5 DSS + Rs 1 RSS + Rs 10 V + Rs 4 MoL) |
| Mumbai Suburban | Rs 30 (Rs 3 DSS + Rs 27 V) | Rs 20 (Rs 2 DSS + Rs 1 RSS + Rs 13 V + Rs 4 MoL) |
| Pune | Rs 20 (Rs 11 V + Rs 9 DSS) | Rs 20 (Rs 4 DSS+ Rs 1 RSS + Rs 11 V + Rs 4 MoL) |
| Jalgaon | Rs 20 (Rs 12.8 V + Rs 7.2 DSS) | Rs 20 (Rs 6.2 DSS + Rs 12.8 V + Rs 1 MoL ) |
| Latur | Rs 20 (Rs 5.64 DSS + Rs 14.36 V) | Rs 20 (Rs 4.64 DSS + Rs 14.36 V + Rs 1 MoL ) |
| Aurangabad | Rs 20 (Rs 12 DSS + Rs 8 V) | Rs 20 (Rs 11 DSS + Rs 8 V+ Rs 1 MoL) |
| Satara | Rs 15 (Rs 4 DSS + Rs 11 V) | Rs 20 (Rs 4 DSS + Rs 1 RSS + Rs 11 V + Rs 4 MoL) |
| Amravati | Rs 15 (Rs 8.50 DSS + Rs 6.50 V) | Rs 20 (Rs 8.50 DSS + Rs 1 RSS + Rs 6.50 V + Rs 4 MoL) |

I. RSS- Rajya Setu Society, DSS- District Setu Society, MoL- Mahaonline, V- Vendor
II. The above arrangement will be in place till expiry of the current contact and no undue extension will be given by the District Setu Society.
III. MahaOnline will enter into agreement with District authorities and Setu operators as per the share proposed in the above table.